अपील अधिकारी तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन)
पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय
शिवाजीनगर पुणे ४११००५
दूरध्वनी क्र. ०२०-२५५०११२३
ई मेल aadmcgeneral@punecorporation.org
अपिल क्र. १८/२०१९
जा.क्र उआ (सा.प्र.)/३६५७ दि. २३/०८/२०१९

अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन) पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय
अपील क्रमांक : पुणे मनपा/अ.प्रा.उआ(सा.प्र.)/अपिल/१८/२०१९

**सौ. धनश्री अविनाश नगराळे**
घर नं. ९९४, रूम नं. ४ व ५
महाकाली बिल्डींग, शेवट बस स्टॉप,
धनकवडी (गावठाण), पुणे ४३.
------------------- अपिलार्थी

विरुद्ध

जन माहिती अधिकारी
तथा प्रशासन अधिकारी,
आस्थापना विभाग,
पुणे महानगरपालिका

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(१) अन्वये अपिल**

**सौ. धनश्री अविनाश नगराळे** रा. घर नं. ९९४, रूम नं. ४ व ५ महाकाली बिल्डींग, शेवट बस स्टॉप, धनकवडी (गावठाण), पुणे ४३. (यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधिले जातील) यांनी जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका यांचेकडे दि. १७.०६.२०१९ रोजी अर्ज करून "१) अनिता आबु माने (जाधव) २) शाम आबु माने ३) एकनाथ आबु माने हे कर्मचारी मनपाकडे कोणत्या विभागात कार्यरत आहेत. त्यांची मनपाकडे असलेली आर्थिक माहिती जसे पद, विभाग, पगार, सगळा सर्व्हिस रेकॉर्ड देण्यात यावा. सध्या राहण्याचा पत्ता व मनपाकडील मोबाईल नं. वगैरे, उपरोक्त ३ व्यक्ती संपूर्ण सर्व्हिस बुकची झेरॉक्स प्रत" इत्यादी माहिती मागितली होती.

अपिलार्थी यांचे मुळ अर्जातील माहिती बाबत जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका यांनी जा. क्र. जमाअ/आस्था/२२२५ दि. २७.०६.२०१९ अन्वये अर्जास उत्तर दिलेले आहे.

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अर्जावरील दिनांक | अर्ज प्रत्यक्ष प्राप्त झाल्याचा दि. | माहिती द्यावयाचा अंतिम दि. | अपिलार्थीस उत्तर/माहिती पाठविल्याचा दि. | विलंब दिवस |
| १७.०६.२०१९ | १७.०६.२०१९ | १६.०७.२०१९ | २७.०६.२०१९ | - |

अपिलार्थी यांनी "मला पाहिजे असलेल्या माहितीमध्ये उपरोक्त कर्मचा-याची मनपाकडे नोंद असलेली नियमाप्रमाणे आर्थिक माहिती दिलेली नाही जसे चलअचल संपत्ती जी शासनाच्या नियमाप्रमाणे शासनाकडे कर्मचा-याच्या चलअचल संपत्ती च्या प्रती मिळाव्यात." असे नमूद करून अपील क्र. १८/२०१९ चा अपील अर्ज दि.१२.०७.२०१९ रोजी दाखल केलेला आहे.

| अपिल अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अपील अर्जाचा दिनांक | अपील अर्ज प्राप्त झाल्याचा दि. | अपील दाखल करावयाचा अंतिम दि. | अपील अर्ज मुदतीत दाखल केला आहे का? | अपील अर्जाच्या विलंब बाबत निवेदन दिले आहे का? |
| १२.०७.२०१९ | २३.०७.२०१९ | २६.०७.२०१९ | होय | - |

सदर प्रकरणी दि. ०९.०८.२०१९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आलेली होती. सदर सुनावणीस अपिलार्थी सौ. धनश्री अविनाश नगराळे रा. घर नं. ९९४, रूम नं. ४ व ५ महाकाली बिल्डींग, शेवट बस स्टॉप, धनकवडी (गावठाण), पुणे ४३ हे उपस्थित होते. श्री चेतन कबाडे जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे मनपा हे उपस्थित होते.

## विवेचन

अपिलार्थी सौ. धनश्री अविनाश नगराळे रा. घर नं. ९९४, रूम नं. ४ व ५ महाकाली बिल्डींग, शेवट बस स्टॉप, धनकवडी (गावठाण), पुणे ४३ यांनी माहिती मिळाली नाही असे प्रतिपादन केले तर श्री चेतन कबाडे जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे मनपा यांनी जा. क्र. जमाअ/आस्था/२२२५ दि. २७.०६.२०१९ अन्वये अर्जास उत्तर दिलेले आहे असे प्रतिपादन केले.

## आदेश

जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे मनपा यांनी अपिलार्थी सौ. धनश्री अविनाश नगराळे रा. २६४ घर नं. ९९४, रूम नं. ४ व ५ महाकाली बिल्डींग, शेवट बस स्टॉप, धनकवडी (गावठाण), पुणे ४३ यांचे अर्जास उत्तर दिलेले आहे. सबब अपील क्र. १८/२०१९ निकाली काढण्यात येत आहे.

(अनिल मुळे)
अपिलीय प्राधिकारी
उप आयुक्त (सामान्य प्रशासन)
पुणे महानगरपालिका